Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

डॉ. प्रमोद आमोदकर नशिराबाद सार्वजनिक वाचनालयाचे प्रभारी अध्यक्ष (पान २ वर)





।सोमवार, दि. २७ एप्रिल २०२६। वर्ष १ ।अंक २२ ।पाने २। DIGITAL EDITION


## »Selected

### बटर गार्लिक नान' जगातील नंबर-1 ब्रेड!

**नवी दिल्ली :** भारतीय खाद्यसंस्कृतीचा सुगंध आता केवळ गल्लीबोळापुरता मर्यादित राहिला नसून, तो सातसमुद्रापार पोहोचला आहे. आपल्याकडील लज्जतदार मसाल्यांनी आणि अनोख्या चवींनी आता अवघ्या जगाला वेड लावले आहे. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या 'जागतिक खाद्य क्रमवारीत' भारतीय पाककलेने मानाचे १३ वे स्थान पटकावले आहे. पण खरी आनंदाची बातमी पुढेच आहे – आपली लाडकी 'बटर गार्लिक नान' हा जगातील नंबर-१ ब्रेड ठरला आहे! अस्सल 'बटर चिकन'ची चव असो किंवा तव्यावरून उतरलेली, तोंडात टाकताच विरघळणारी गरमागरम 'बटर गार्लिक नान'; परदेशी पाहुणे आता भारतीय चवीच्या प्रेमात पूर्णपणे बुडाले आहेत. जागतिक स्तरावर विविध देशांच्या खाद्यपदार्थांचे सर्वेक्षण करण्यात आले, ज्यामध्ये भारतीय पदार्थांमधील विविधता, मसाल्यांचा संतुलित वापर आणि बनवण्याची पारंपारिक पद्धत याला विशेष पसंती मिळाली आहे. जगभरातील शेकडो प्रकारच्या ब्रेड्सना मागे टाकत भारताच्या 'बटर गार्लिक नान'ने अव्वल स्थान पटकावले आहे.

## १२ मे मतदानाच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग; बिनविरोध निवडणुकीवर प्रश्नचिन्ह

# विधान परिषदेसाठी शिवसेनेची 'धक्कातंत्र' रणनीती?

## महायुतीला ८, मविआला १ जागेची शक्यता | शिवसेनेची 'गेमचेंजर' चाल? उमेदवारीसाठी अनेक नेत्यांमध्ये स्पर्धा

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी**
**राज्यातील विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापू लागले असून, १२ मे रोजी होणाऱ्या मतदानापूर्वी सर्वच पक्षांनी जोरदार हालचाली सुरू केल्या आहेत. संख्याबळानुसार महायुतीला आठ तर महाविकास आघाडीला एक जागा मिळण्याची शक्यता असताना, शिवसेना कडून ऐनवेळी दहावा उमेदवार रिंगणात उतरवण्याची रणनीती आखली जात असल्याची चर्चा रंगली आहे. त्यामुळे ही निवडणूक बिनविरोध होण्याच्या शक्यतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.**





**संख्याबळाचे गणित आणि राजकीय खेळी**

विधान परिषद निवडणुकीत एका उमेदवाराच्या विजयासाठी २९ मतांचा कोटा आवश्यक आहे. सत्ताधारी महायुतीत भाजपने सहा जागांवर दावा केला असून, पक्षातील अनेक इच्छुकांची नावे चर्चेत आहेत. मात्र, अंतिम क्षणी 'धक्कातंत्र' वापरून वेगळे चेहरे पुढे आणण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दुसरीकडे, एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे विधानसभेतील ५७ आमदार लक्षात घेता दोन जागा जिंकणे सोपे मानले जात आहे. तरीही अतिरिक्त उमेदवार उतरवून राजकीय समीकरणे बदलण्याचा प्रयत्न केला जाऊ शकतो.

**शिवसेनेत इच्छुकांची लांबलचक यादी**

शिवसेनेकडून विधान परिषदेच्या संभाव्य उमेदवारांमध्ये नीलम गोऱ्हे, बच्चू कडू, रवींद्र धंगेकर, डॉ. रोहित टिळक, राजू वाघमारे आणि शायना एनसी यांची नावे चर्चेत आहेत. राज्यसभा निवडणुकीप्रमाणेच यावेळीही अनपेक्षित उमेदवार देण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**राष्ट्रवादी आणि इतर मित्रपक्षांची स्थिती**

राष्ट्रवादी काँग्रेस च्या वाट्याला एक जागा येण्याची शक्यता असून, अमोल मिटकरी, आनंद परांजपे, समीर भुजबळ, सूरज चव्हाण, उमेश पाटील आणि अनिकेत तटकरे यांची नावे चर्चेत आहेत. मित्रपक्षांमध्ये जागावाटपावरून चुरस वाढत असल्याचे चित्र आहे.

**बिनविरोध निवडणुकीवर प्रश्नचिन्ह**

भाजपच्या वरिष्ठ नेत्यांकडून ही निवडणूक बिनविरोध व्हावी, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मात्र, शिवसेनेने अतिरिक्त उमेदवार उभा केल्यास निवडणूक चुरशीची होण्याची शक्यता आहे. काँग्रेस व राष्ट्रवादीच्या मतांमध्ये फूट पाडण्याची शक्यता देखील राजकीय वर्तुळात चर्चेत आहे.

**मविआमध्येही अंतर्गत स्पर्धा**

महाविकास आघाडीकडून उद्धव ठाकरे यांनीच निवडणूक लढवावी, असा आग्रह काँग्रेसकडून धरण्यात येत आहे. मात्र, त्यांनी नकार दिल्यास अंबादास दानवे, सुषमा अंधारे, विनायक राऊत, राजन विचारे आणि वैभव नाईक यांच्यात उमेदवारीसाठी स्पर्धा आहे. काँग्रेसकडून बाळासाहेब थोरात, सचिन सावंत आदींची नावे चर्चेत आहेत.

### विधान परिषदेच्या निवडणुकीचा संपूर्ण कार्यक्रम

- **निवडणुकीची अधिसूचना जारी करणे :** 23 एप्रिल, 2026
- **उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस:** 30 एप्रिल 2026
- उमेदवारी अर्जांची छाननी: **2 मे 2026**
- **उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख:** 4 मे 2026
- **मतदानाची तारीख:** 12 मे 2026
- **मतदानाची वेळ:** सकाळी 9 वाजेपासून ते संध्याकाळी 4 वाजेपर्यंत आहे.
- **मतमोजणी:** 12 मे 2026 संध्याकाळी 5 वाजता
- **निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याची अंतिम तारीख:** 13 मे 2026

### राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता

एकूणच, विधान परिषद निवडणुकीत संख्याबळ स्पष्ट असले तरी शिवसेनेच्या संभाव्य 'दहाव्या उमेदवाराच्या' निर्णयामुळे संपूर्ण राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे. येत्या काही दिवसांत उमेदवारी जाहीर झाल्यानंतरच अंतिम चित्र स्पष्ट होणार आहे.

विधानपरिषदेत निवडून येण्यासाठी एका उमेदवाराला 28 मतांचा कोटा आवश्यक असतो. शिवसेनेचे विधानसभेतील संख्याबळ हे 57 असून विधान परिषदेची दुसरी जागा निवडून येण्यास कोणतीही अडचण नाही.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

## गुजरातमध्ये स्थानिक स्वराज्य निवडणुकांसाठी मतदान!

### अमित शाहांनी अहमदाबादमध्ये बजावला हक्क



जन सम्राट टाईम्स

**अहमदाबाद :** गुजरातमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी रविवारी उत्साहपूर्ण वातावरणात मतदान पार पडले. राज्यातील १५ महानगरपालिका, ८४ नगरपालिका तसेच २०० हून अधिक जिल्हा व तालुका पंचायतांमध्ये ही निवडणूक प्रक्रिया राबविण्यात आली. या निवडणुकांकडे राज्याच्या राजकीय दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे पाऊल म्हणून पाहिले जात आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी अहमदाबादमध्ये जाऊन आपला मतदानाचा हक्क बजावला. मतदानानंतर त्यांनी नागरिकांना लोकशाही बळकट करण्यासाठी मोठ्या संख्येने मतदान प्रक्रियेत सहभागी होण्याचे आवाहन केले.

**भक्कम सुरक्षा व्यवस्था**

मतदान प्रक्रिया सुरळीत आणि शांततेत पार पडावी यासाठी गुजरात राज्य निवडणूक आयोग यांनी राज्यभरातील सुमारे ४८ हजार मतदान केंद्रांवर कडेकोट सुरक्षा व्यवस्था तैनात केली होती.

**उष्णतेचा परिणाम, संध्याकाळी वाढले मतदान**

दिवसाच्या सुरुवातीला कडाक्याच्या उन्हामुळे मतदानाचा वेग मंदावलेला दिसून आला. मात्र, दुपारनंतर हवामानात काहीसा बदल होताच मतदारांचा प्रतिसाद वाढू लागला. विशेषतः सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदानाचा टक्का लक्षणीयरीत्या वाढले.

**मतमोजणी २८ एप्रिलला**

या निवडणुकांची मतमोजणी २८ एप्रिल रोजी करण्यात येणार असून निकालांवर सर्वांचे लक्ष लागले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या या निवडणुका आगामी राजकीय समीकरणांसाठी दिशादर्शक ठरणार असल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहे.

**अहमदाबाद महानगरपालिकेत सर्वात कमी मतदानाची नोंद**

महानगरपालिका निवडणुकीत अंदाजे २८ टक्के, तर नगर पालिका निवडणुकीत ३७ टक्के मतदान झाल्याचे वृत्त आहे. दुपारी १ वाजेपर्यंत तालुका पंचायत निवडणुकीत ३७ टक्क्यांहून अधिक, तर जिल्हा पंचायत निवडणुकीत ३५ टक्क्यांहून अधिक मतदारांनी मतदान केले. मोरबी महानगरपालिकेत सर्वाधिक ३९ टक्के, तर अहमदाबाद महानगरपालिकेत सर्वात कमी २२ टक्के मतदानाची नोंद झाली.

# जळगाव पोलिसांची मोठी मोहीम; अवैध वाळू वाहतुकीवर लगाम

## सलग दुसऱ्या दिवशी धडक कारवाई; ८ वाहने जप्त, ५५ लाखांचा मुद्देमाल ताब्यात

जन सम्राट टाईम्स

**जळगाव** | जळगाव जिल्ह्यात अवैध वाळू वाहतूक व उपसा करणाऱ्यांविरोधात जिल्हा पोलीस दलाने सलग दुसऱ्या दिवशीही मोठी संयुक्त मोहीम राबवत कठोर कारवाई केली आहे. पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली २४ एप्रिल २०२६ रोजी सुरू झालेली ही कारवाई २५ एप्रिल रोजी पहाटे ५ वाजेपर्यंत जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत एकाच वेळी पार पडली. या धडक मोहिमेदरम्यान अवैध वाळू वाहतूक करणारी एकूण ८ वाहने ताब्यात घेण्यात आली. संबंधित वाहनचालकांविरुद्ध बी.एन.एस. २०२३ च्या कलम ३०३(२) तसेच मोटार वाहन अधिनियम १९८८ च्या कलम १३०(१) व १७७ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलीस स्टेशननिहाय कारवाई धरणगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत ३ ट्रॅक्टर जप्त करण्यात आले असून त्यांची किंमत सुमारे १२ लाख रुपये आहे, तर वाळूची किंमत १२ हजार रुपये आहे.



जळगाव तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत २ डंपर जप्त करण्यात आले असून त्यांची किंमत सुमारे १५ लाख रुपये व वाळूची किंमत १८ हजार रुपये आहे. एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत ३ डंपर जप्त करण्यात आले असून त्यांची किंमत सुमारे २८ लाख रुपये व वाळूची किंमत २२ हजार रुपये आहे.

एकूण जप्त वाहनांची किंमत सुमारे ५५ लाख रुपये असून, जप्त करण्यात आलेल्या अवैध वाळूची किंमत सुमारे ४२ हजार रुपये आहे. या कारवाईमुळे अवैध वाळू माफियांमध्ये खळबळ उडाली आहे.

संयुक्त पथकाची कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन गणापुरे यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या पथकासोबत संयुक्त कारवाई करत ३ डंपर जप्त केले. विविध पथकांनी समन्वय साधत ही मोहीम यशस्वीपणे पार पाडली.

कारवाई सुरूच राहणार अवैध वाळू वाहतुकीवर नियंत्रण मिळवण्यासाठी पोलिसांकडून कठोर पावले उचलण्यात येत असून, जिल्ह्यातील खनिज संपत्तीची चोरी करणाऱ्यांविरुद्ध अशा प्रकारच्या कारवाया पुढेही सातत्याने सुरू राहतील, असा इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक कविता नेरकर (चाळीसगाव परिमंडळ) आणि अपर पोलीस अधीक्षक संदीप गावित (जळगाव परिमंडळ) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

## केनियाच्या सबॅस्टियन सावेने दोन तासांचा टप्पा ओलांडून रचला नवा जागतिक विक्रम

जन सम्राट टाईम्स

**लंडन** | क्रीडा विश्वात रविवारी एका ऐतिहासिक अध्यायाची नोंद झाली. केनियाच्या सबॅस्टियन सावे याने लंडन मॅरेथॉनमध्ये अभूतपूर्व कामगिरी करत 'दोन तासांच्या आत मॅरेथॉन' पूर्ण करण्याचे मानवी स्वप्न साकार केले आहे. सावेने ही शर्यत अवघ्या १ तास ५९ मिनिटे आणि ३० सेकंदात पूर्ण करून नवा जागतिक विक्रम प्रस्थापित केला. अधिकृत स्पर्धात्मक शर्यतीत दोन तासांपेक्षा कमी वेळात ४२.२ किलोमीटरचे अंतर पार करणारा सावे हा जगातील पहिला धावपटू ठरला आहे. त्याने केनियाच्याच दिवंगत केल्विन किप्टम यांचा २ तास ०० मिनिटे ३५ सेकंदांचा जागतिक विक्रम मोडीत काढला. सावेने १:५९:३० अशी वेळ नोंदवून जुन्या विक्रमात १ मिनिट ५ सेकंदांची मोठी कपात केली.

लंडन मॅरेथॉन ही शर्यत अत्यंत चुरशीची ठरली. इथियोपियाच्या योमिफ केजेल्चा यानेही १:५९:४१ वेळेसह दोन तासांचा टप्पा ओलांडला आणि दुसरे स्थान पटकावले. युगांडाच्या जेकब किप्लिमोने २:००:२८ वेळेसह तिसरे स्थान मिळवले. विशेष म्हणजे, पहिल्या तिन्ही धावपटूंनी जुन्या जागतिक विक्रमापेक्षा कमी वेळ नोंदवली.

**महिला गटात इथियोपियाची तिग्स्त असेफा विजेती**

महिलांच्या शर्यतीत इथियोपियाच्या तिग्स्त असेफाने २:१५:४१ वेळेसह आपले जेतेपद राखले आणि 'ओन्ली वुमेन' मॅरेथॉनचा नवा जागतिक विक्रम नोंदवला. विजयानंतर बोलताना ३१ वर्षीय सावे म्हणाला, "आजचा दिवस माझ्यासाठी अविस्मरणीय आहे. शर्यतीच्या सुरुवातीपासूनच आम्ही चांगल्या लयीत होतो. शेवटच्या टप्प्यात मला अधिक ताकद जाणवत होती आणि फिनिशिंग लाईनवर वेळ पाहिल्यावर माझा आनंद गगनात मावेनासा झाला. हा केवळ माझा विजय नसून संपूर्ण क्रीडा विश्वासाठी एक मोठा क्षण आहे."

# धीरेंद्र शास्त्रींनी नको त्या विषयात बोलू नये

## छत्रपती शिवाजी महाराजांबाबत वादग्रस्त विधानावरून वातावरण पेटले

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | विशेष प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल बागेश्वर धामचे धीरेंद्र शास्त्री यांनी केलेल्या एका वादग्रस्त विधानामुळे महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणावरून मनोरंजन सृष्टीतील कलाकार आणि राजकीय नेते अशा दोन्ही स्तरांतून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. विशेषतः अभिनेते रितेश देशमुख आणि खासदार संजय राऊत यांच्याबरोबरच इतिहास अभ्यासक श्रीमंत कोकाटे यांनी या विधानाचा कडक शब्दांत निषेध केला आहे.

रितेश देशमुख यांनी याबाबत तीव्र संताप व्यक्त केला आहे. भिवंडी येथील शक्तीपीठात छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिराला पत्नी जेनेलियासह भेट दिल्यानंतर रितेश देशमुख यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी ते म्हणाले, "छत्रपती शिवाजी महाराज हे आमचे दैवत आहेत. त्यांच्याबद्दल कुणीही येतो आणि काहीही बोलून जातो, हे आता खपवून घेतले जाणार नाही." महाराजांचा अवमान करणाऱ्यांचा तीव्र निषेध केला.

**संजय राऊतांचा सवाल**

खासदार संजय राऊत यांनी धीरेंद्र शास्त्रींच्या विधानाचा समाचार घेताना सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. "अशा प्रकारचे विधान जर दुसऱ्या कुणी केले असते, तर आतापर्यंत काय झाले असते?" असा सवाल करत त्यांनी कारवाईची मागणी केली. महाराजांच्या अपमानाबाबत दुजाभाव केला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.

**नेमका वाद काय?**

धीरेंद्र शास्त्री यांनी एका कार्यक्रमात महाराजांबद्दल आक्षेपार्ह विधान केल्याचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर प्रसारित झाला होता. यामुळे शिवप्रेमींमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. केवळ शास्त्रीच नव्हे, तर आमदार संजय गायकवाड यांच्या विधानावरही रितेश देशमुख यांनी नाराजी व्यक्त केली आहे. इतिहासकार श्रीमंत कोकाटे यांनी हा अत्यंत हलकट पणा आणि नालायकपणा असल्याचे म्हटले.

### अखेर बागेश्वर बाबांचा माफीनामा



छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल वादग्रस्त वक्तव्य केल्याप्रकरणी बागेश्वर धामचे पीठासीन बागेश्वर बाबा उर्फ धीरेंद्र शास्त्र हे वादात सापडले आहेत. "छत्रपती शिवाजी महाराज हे युद्ध लढून थकले आणि त्यांनी आपलं मुकूट रामदास स्वामी यांच्याजवळ ठेवलं. आपण आता थकलो असून हा राजपाट सांभाळा, असं शिवाजी महाराज रामदास स्वामींना म्हणाले. त्यावर रामदास स्वामी यांनी गुरु कोण आणि शिष्ट कोण? असा प्रश्न विचारला. त्यावर शिवाजी महाराजांनी आपण गुरु आणि मी शिष्य असल्याचं रामदास स्वामींना म्हटलं. यानंतर रामदास स्वामी यांनी आतापासून हे राज्य आपलं असून तुम्ही या राज्याचा कार्यभार सांभाळावा असा मी आदेश देतो, असं रामदास स्वामी शिवाजी महाराजांना म्हणाले", असं वादग्रस्त वक्तव्य बागेश्वर बाबा यांनी नागपुरात कार्यक्रमात केलं होतं. त्यांच्या या वक्तव्यावरुन राज्यभरात संतापाची लाट पसरली होती. त्यामुळे अखेर आपल्या वक्तव्यावर स्पष्टीकरण देत बागेश्वर बाबा यांनी माफी मागितली आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज ज

# शिरपूरची सेंट्रल लायब्ररी विद्यार्थ्यांसाठी ठरेल ज्ञानकेंद्र - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## केतकीबेन पटेल सेंट्रल लायब्रीस भेट; शिक्षण, जलसंधारण व आरोग्य क्षेत्रातील प्रगतीचे कौतुक

जन सम्राट टाईम्स

**शिरपूर : देवेंद्र फडणवीस यांनी शिरपूर येथील केतकीबेन मुकेशभाई पटेल सेंट्रल लायब्रीस भेट देत, ही लायब्ररी विद्यार्थ्यांसाठी एक प्रभावी ज्ञानकेंद्र ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. शिरपूर शहराने जलसंधारणासोबतच शिक्षण, आरोग्य आणि औद्योगिक क्षेत्रात साधलेली प्रगती राज्यासाठी पथदर्शी असल्याचे त्यांनी नमूद केले.**



मुख्यमंत्र्यांच्या या भेटीदरम्यान आमदार अमरिशभाई पटेल आणि आमदार काशिराम पावरा यांची उपस्थिती होती. लायब्ररीच्या अत्याधुनिक सुविधांची पाहणी करताना फडणवीस यांनी विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या संसाधनांचे कौतुक केले.

**शिरपूरचा विकास मॉडेल ठरत आहे आदर्श**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, शिरपूरमध्ये राबविण्यात आलेले जलसंधारण मॉडेल यापूर्वीच राज्यभरात आदर्श ठरले आहे. आता त्याच धर्तीवर शिक्षण क्षेत्रातही शहराने उल्लेखनीय कामगिरी केली असून देशपातळीवर वेगळी ओळख निर्माण केली आहे. आधुनिक सुविधा असलेल्या सेंट्रल लायब्ररीमुळे विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक वातावरण मिळत आहे.

**शिक्षण आणि आरोग्य सुविधांवर भर**

शहरात उभारण्यात आलेल्या सेंट्रल लायब्ररीसोबतच नव्याने सुरू करण्यात आलेल्या आधुनिक रुग्णालयामुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठा लाभ होत असल्याचे त्यांनी सांगितले. शिक्षण आणि आरोग्य या दोन महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये झालेली प्रगती ही शहराच्या सर्वांगीण विकासाची साक्ष देत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

**संपर्क कार्यालयालाही भेट**

या दौऱ्यादरम्यान मुख्यमंत्र्यांनी आमदार काशिराम पावरा यांच्या संपर्क कार्यालयालाही भेट दिली. स्थानिक विकासकामांबाबत त्यांनी माहिती घेतली आणि पुढील योजनांबाबत चर्चा केली.

### विद्यार्थ्यांसाठी नवे संधीद्वार

केतकीबेन पटेल सेंट्रल लायब्ररीमुळे शिरपूर परिसरातील विद्यार्थ्यांना आधुनिक व समृद्ध ज्ञानस्रोत उपलब्ध झाले असून, ही लायब्ररी भविष्यात शिक्षण क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# आता देशातच बनणार स्वदेशी एमआरआय मशीन

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली :** भारतीय आरोग्य सेवा क्षेत्रासाठी आजचा दिवस सुवर्ण अक्षरांनी लिहिला जाणारा ठरला आहे. आतापर्यंत अत्यंत महागड्या आणि आयात कराव्या लागणाऱ्या एमआरआय मशिनच्या बाबतीत भारताने आत्मनिर्भरतेच्या दिशेने मोठे पाऊल टाकले आहे. बंगळुरूस्थित 'व्होक्सेल ग्रिड्स' या कंपनीने टाटा ट्रस्टच्या सहकार्याने भारताचे पहिले स्वदेशी एमआरआय मशिन विकसित करण्यात यश मिळवले आहे. या क्रांतीमुळे देशातील सामान्य रुग्णांना होणारा एमआरआय चाचण्यांचा त्रास आणि खर्च दोन्ही मोठ्या प्रमाणात कमी होणार आहेत.



"मेक इन इंडिया" एमआरआय मशीनचा थेट रुग्णांच्या खिशाला फायदा होणार असून तपासणी दर ७० टक्क्यांपर्यंत दर कमी होऊ शकतात. सध्या भारतात एमआरआय चाचणी करण्यासाठी रुग्णांना खासगी रुग्णालयांत ५,००० ते १५,००० रुपये मोजावे लागतात. मात्र, स्वदेशी तंत्रज्ञानामुळे हे चित्र पूर्णपणे बदलणार आहे. 'मेक इन इंडिया' अंतर्गत तयार झालेले हे एमआरआय मशिन भारताच्या आरोग्य क्रांतीचा केंद्रबिंदू ठरेल. आता 'तारीख' लांब असण्याचे आणि 'खर्चाचे' टेन्शन सामान्य रुग्णांच्या आयुष्यातून कायमचे निघून जाण्याचे स्वप्न सत्यात उतरताना दिसत आहे. जर भारताने या मशिनची स्वतःची इकोसिस्टम पूर्णपणे विकसित केली, तर एमआरआय चाचण्यांचे दर ५०% ते ७०% पर्यंतकमी होऊ शकतात.

Selected

## जळगावात पुन्हा 'हिट अँड रन'; दुचाकीच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**जळगाव :** जळगाव शहरात पुन्हा एकदा 'हिट अँड रन'ची धक्कादायक घटना समोर आली असून भरधाव दुचाकीच्या धडकेत २७ वर्षीय तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. ही घटना कुसुंबा-जळगाव रोडवरील धनदाई माता मंदिराजवळ घडली. अक्षय राजेश पाटील (वय २७) असे मृत तरुणाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस कॉलनी (एमआयडीसी) परिसरात राहणारा अक्षय पाटील हा धनदाई माता मंदिरासमोरून 'लकी फर्निचर' दुकानाच्या दिशेने पायी रस्ता ओलांडत होता. याच वेळी कुसुंबाकडून जळगावकडे येणाऱ्या एका अज्ञात दुचाकी चालकाने अत्यंत वेगाने वाहन चालवत अक्षयला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की अक्षय गंभीर जखमी झाला आणि उपचाराधीच त्याचा मृत्यू झाला. अपघातानंतर जखमीला मदत करण्याऐवजी संबंधित दुचाकी चालकाने घटनास्थळावरून पळ काढला. या अमानुष प्रकारामुळे परिसरात संताप व्यक्त केला जात आहे. नागरिकांनी अशा निष्काळजी वाहनचालकांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. या घटनेची माहिती मिळताच मृत तरुणाचे वडील राजेश विठ्ठल पाटील यांनी एमआयडीसी पोलीस ठाणे येथे फिर्याद दाखल केली. पोलिसांनी अज्ञात दुचाकी चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) तसेच मोटार वाहन कायद्यानुसार गुन्हा नोंदवला आहे.

# कर्तव्यदक्षता पडली महागात!

## एरंडोलमध्ये गुटखा माफियावर कारवाई करणाऱ्या एफडीए अधिकाऱ्यावरच खंडणीचा खोटा गुन्हा!

- स्थानिक लोकप्रतिनिधींच्या प्रभावातून एका त्रयस्थ व्यक्तीने कट रचून दाखल करवून घेतला गुन्हा?
- प्रतिबंधित खाद्यपदार्थांवर झालेल्या कायदेशीर कारवाईच्या रागातून कुभांड रचल्याचा आरोप
- अन्न अधिकारी कल्याणकारी संघटनेतर्फे निषेध व मंत्री नरहरी झिरवाळ यांना निवेदन




जन सम्राट टाईम्स

**मुंबई | विक्रांत पाटील**

जळगाव जिल्ह्यातील एरंडोल येथे गुटखा माफियांविरोधात धाडसी कारवाई करणाऱ्या अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए) एका अन्न सुरक्षा अधिकाऱ्यालाच आता कायदेशीर कचाट्यात अडकवण्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. कायद्याचे पालन करून कर्तव्य बजावणाऱ्या या अधिकाऱ्यावर चक्क खंडणीचा गुन्हा (एफआयआर) दाखल करण्यात आला असून, या घटनेमुळे प्रशासकीय वर्तुळात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

**सूडबुद्धीने कारवाई केल्याचा संघटनेचा आरोप**

अन्न अधिकारी कल्याणकारी संघटनेने या प्रकरणाचा तीव्र निषेध केला असून हा गुन्हा पूर्णपणे खोटा असल्याचा दावा केला आहे. संघटनेच्या मते, स्थानिक लोकप्रतिनिधींच्या दबावाखाली एका त्रयस्थ व्यक्तीला हाताशी धरून हा कट रचला गेला आहे. प्रतिबंधित गुटखा आणि सुगंधित सुपारीवर केलेल्या कारवाईचा राग मनात धरून अधिकाऱ्याचे खच्चीकरण करण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे.

**मंत्र्यांचे आश्वासक पाऊल**

या गंभीर विषयाची दखल घेत संघटनेचे अध्यक्ष डॉ. राम मुंडे, सचिव गोपाल महोरे आणि केंद्रीय संघटनेचे उपाध्यक्ष निलेश माळी यांनी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांची भेट घेतली. मंत्र्यांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत, मुख्यमंत्री आणि पोलीस महासंचालकांशी चर्चा करून न्याय मिळवून देण्याचे आश्वासन दिले आहे. तसेच, एफडीए आयुक्तांनीही या प्रकरणी स्थानिक पोलीस अधीक्षक आणि जिल्हाधिकाऱ्यांकडून माहिती मागवली आहे.

**सीसीटीव्ही फुटेजमुळे सत्य बाहेर येणार!**

डॉ. राम मुंडे यांनी एफआयआरमधील विसंगतींवर बोट ठेवले आहे. ज्या वेळी खंडणी मागितल्याचा आरोप केला जात आहे, त्या वेळी संबंधित अधिकारी पोलीस संरक्षण मिळवण्यासाठी स्वतः पोलीस ठाण्यात हजर होते. संघटनेने आता या प्रकरणाचे दूध का दूध आणि पाणी का पाणी करण्यासाठी खालील पुराव्यांची मागणी केली आहे -

### संघटनेच्या प्रमुख मागण्या

1. एरंडोल येथील अधिकाऱ्यावर दाखल झालेला खंडणीचा खोटा गुन्हा तात्काळ रद्द करावा.
2. संबंधित अधिकाऱ्यांना पूर्णपणे शासकीय संरक्षण आणि न्याय देण्यात यावा.
3. अशा धाडींदरम्यान अधिकाऱ्यांना 'अनिवार्य पोलीस संरक्षण' देण्याचे स्पष्ट आदेश शासनाने काढावेत.
4. कर्तव्यावर असलेल्या अधिकाऱ्यांवर दबाव आणणाऱ्या किंवा हल्ले करणाऱ्यांविरुद्ध कठोर कायदे करावेत.
5. प्रतिबंधित पदार्थांवरील कारवाईसाठी मुख्यालय स्तरावरून एक निश्चित कार्यपद्धती (SOP) जाहीर करावी.
6. पोलीस यंत्रणेने शहानिशा केल्याशिवाय शासकीय अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करू नयेत, असे निर्देश द्यावेत.

जन सम्राट टाईम्स — विशेष बातमी

## "रक्तदानातून जपली मानवतेची परंपरा" – मंत्री गुलाबराव पाटील

### प्रतापराव पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त पाळधीत भव्य शिबिर; ५५ पेक्षा अधिक बाटल्या रक्तसंकलन



। जन सम्राट टाईम्स ।

**पाळधी / जळगाव |** वाढदिवसासारख्या वैयक्तिक आनंदाच्या क्षणांना सामाजिक कार्याशी जोडणे ही समाजासाठी प्रेरणादायी बाब असून रक्तदानासारख्या उपक्रमांमुळे मानवतेची भावना अधिक दृढ होते, असे प्रतिपादन गुलाबराव पाटील यांनी केले. प्रतापराव पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित रक्तदान शिबिरात ते बोलत होते.

माजी जिल्हा परिषद सदस्य तथा युवा नेते प्रतापराव पाटील यांच्या ३५ व्या वाढदिवसानिमित्त पाळधी येथे आयोजित भव्य रक्तदान शिबिर उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या उपक्रमात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत ५५ पेक्षा अधिक बाटल्या रक्तसंकलन करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. शासकीय विश्रामगृह, पाळधी येथे पार पडलेल्या या शिबिराचा शुभारंभ पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. युवक, कार्यकर्ते आणि सर्वसामान्य नागरिकांनी उत्साहाने रक्तदान करत सामाजिक उत्तरदायित्वाचे दर्शन घडवले.

**रक्तदात्यांचा सन्मान**

या वेळी प्रतापराव पाटील यांच्या हस्ते रक्तदात्यांना पाण्याचे जार व प्रशस्तीपत्रक देऊन सन्मानित करण्यात आले. "रक्तदान हेच खरे जीवनदान आहे. माझ्या वाढदिवसानिमित्त नागरिकांनी दाखवलेले प्रेम अमूल्य आहे," अशी भावना प्रतापराव पाटील यांनी व्यक्त केली. संघटनांचा मोलाचा सहभाग या शिबिरासाठी प्रतापराव पाटील मित्र परिवार, विक्की बाबा युवा मंच, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष, GPS मित्र परिवार, युवासेना जळगाव ग्रामीण तसेच शिवसेना जळगाव ग्रामीण यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे आयोजन बीएम ग्रुप, पाळधी यांच्या वतीने करण्यात आले.

**मान्यवरांची उपस्थिती**

या कार्यक्रमाला शिवसेनेचे एरंडोल व अमळनेर जिल्हाप्रमुख वासुदेव पाटील, जळगाव शहर व ग्रामीण जिल्हाप्रमुख विष्णू भंगाळे, उपमहापौर मनोज चौधरी, उद्योगपती शरद कासट व गोपाल कासट, नगरसेवक कुंदन काळे, ॲड. बबन पोकळे, माजी सभापती सचिन पवार, मुकुंदराव नन्नवरे, युवासेनेचे दीपक भदाणे, सरपंच विजय पाटील व गोपाल पाटील, तसेच धरणगावचे पोलीस निरीक्षक पवार, एपीआय भूषण काटे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## राज्यात एप्रिलमधील उच्चांक तापमान; अकोल्यात पारा ४६.९°C वर

**मुंबई | प्रतिनिधी :** राज्यात एप्रिल महिन्यातील उष्णतेचा कहर शिगेला पोहोचला असून विदर्भात उष्णतेची लाटेसदृश्य स्थिती निर्माण झाली आहे. अकोला येथे रविवारी ४६.९ अंश सेल्सिअस इतके कमाल तापमान नोंदवले गेले, जे मागील पाच वर्षांतील एप्रिलमधील सर्वाधिक तापमान ठरले आहे. त्यामुळे नागरिकांना प्रचंड उकाड्याचा सामना



करावा लागत आहे. गेल्या काही दिवसांपासून विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये तापमान सरासरीपेक्षा ३ ते ४ अंशांनी अधिक नोंदले जात आहे. अमरावती येथे ४६.८°C, वर्धा येथे ४६.४°C, तर यवतमाळ येथे ४६°C इतके कमाल तापमान नोंदले गेले. विदर्भातील अनेक भागांत पारा ४२ ते ४५ अंशांच्या दरम्यान राहिला. सध्या राज्यात कोरडे हवामान असून प्रतिचक्रवाती स्थितीमुळे तापमानात वाढ होत आहे. पश्चिमी विक्षोभाचा प्रभाव पूर्वेकडे सरकत असल्याने उष्णतेची तीव्रता वाढल्याचे हवामान विभागाने स्पष्ट केले आहे. यामुळे मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातही उष्णतेचा तडाखा वाढला आहे, तर कोकणात उष्ण व दमट हवामानामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, पुढील दोन दिवस विदर्भात उष्णतेची लाट कायम राहण्याची शक्यता आहे. सोमवारी राज्यभर कोरडे हवामान राहील, तसेच कमाल तापमानात फारसा बदल होणार नाही. राज्यातील अंतर्गत भागात तापमान ४२ ते ४४ अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याचा अंदाज आहे.

**दिलासा कधी मिळणार?**

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, पुढील चार ते पाच दिवसांनंतर कमाल तापमानात २ ते ३ अंशांनी घट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांना काहीसा दिलासा मिळू शकतो.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

## जागतिक पुस्तक दिनानिमित्त दादरमध्ये कविसंमेलन व पुस्तक प्रकाशन सोहळा उत्साहात

### अभिवाचन, कविता सादरीकरणातून वाचनसंस्कृतीचा जागर; डॉ. हेमंतराजे गायकवाड यांच्या ग्रंथाचे प्रकाशन



जन सम्राट टाईम्स

**मुंबई :** जागतिक पुस्तक दिनानिमित्त २३ एप्रिल २०२६ रोजी दादर (पश्चिम) येथील डॉ. गायकवाड इन्स्टिट्यूट येथे कविसंमेलन, अभिवाचन आणि पुस्तक प्रकाशन सोहळा उत्साहात पार पडला. श्री शिवाजी ज्ञानपीठ इंटरनॅशनल आणि मराठी साहित्य व कला सेवा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमाला साहित्यप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

सायंकाळी ६ ते ८ या वेळेत पार पडलेल्या या उपक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या शिवगर्जनेने झाली. प्रस्तावनेतून कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट करत वाचनसंस्कृती जपण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. त्यानंतर विविध कवी आणि अभिवाचकांनी 'पुस्तक' या विषयावर आधारित स्वरचित कविता आणि निवडक साहित्यकृतींचे प्रभावी सादरीकरण केले.

चंद्रकांत दढेकर, मीनल शेकटकर कांबळे, मीना ठाकोर, राजन देसाई आणि रंजन गावडे यांनी अभिवाचन सादर केले. तर सरोज सुरेश गाजरे, कल्पना उबाळे, कल्पना मापूसकर, ज्योती राखुंडे, प्रतिभा नवघरे, समिधा विकास नलावडे, सीमा खान शेख, मनोहर वाळिंबे, संतोष धर्मराज मोहिते, वनिता सचिन साळुंखे आणि गुरुदत्त दिनकर वाकदेकर यांनी आपल्या कवितांद्वारे रसिकांची मनं जिंकली.

**शिवा बावणीचे सादरीकरण विशेष आकर्षण**

कार्यक्रमात अरहंत किरण जाधव, श्रेयस रवींद्र कदम, ऋतुजा कौशल पाटील आणि वनिता सचिन साळुंखे यांनी विविध छंदांमध्ये 'शिवा बावणी'चे सादरीकरण करून उपस्थितांची दाद मिळवली.

**ग्रंथ प्रकाशन सोहळा**

या कार्यक्रमातील मुख्य आकर्षण ठरलेल्या पुस्तक प्रकाशन सोहळ्यात डॉ. हेमंतराजे गायकवाड लिखित "प्रतापगड युद्ध : हिंदू पदपातशाह छत्रपती शिवाजी महाराजांचा उदय" या ग्रंथाच्या मराठी आवृत्तीचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी लेखकांनी आपल्या मनोगतातून वाचनसंस्कृती जपण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

## जागतिक मलेरिया दिनानिमित्त नाशिराबादमध्ये जनजागृती रॅली

### गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंगचा पुढाकार; विद्यार्थ्यांकडून मलेरिया प्रतिबंधाबाबत जागरूकता

जन सम्राट टाईम्स







**जळगाव :** जागतिक मलेरिया दिनानिमित्त नाशिराबाद येथे जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंग, जळगावच्या कम्युनिटी हेल्थ नर्सिंग विभागाच्या वतीने आयोजित या रॅलीत विद्यार्थ्यांनी उत्साहात सहभाग घेत मलेरियाविषयी जनजागृती करण्याचा संदेश दिला.

रॅलीदरम्यान विद्यार्थ्यांनी "मलेरिया टाळा, आरोग्य सांभाळा" अशा घोषणा देत नागरिकांचे लक्ष वेधले. हातात चार्ट्स आणि बॅनर्स घेऊन त्यांनी मलेरियाचे कारण, लक्षणे आणि प्रतिबंधक उपाय यांची सविस्तर माहिती दिली. नागरिकांमध्ये रोगाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी हा उपक्रम प्रभावी ठरला.

या कार्यक्रमाचे आयोजन नाशिराबाद प्राथमिक आरोग्य केंद्र यांच्या सहकार्याने करण्यात आले. प्रा. निर्भय मोहाड, प्रा. स्वाती गाडेगोणे, प्रा. दिव्याना पवार, प्रा. अश्लेषा मून, प्रा. रितेश पडघान, प्रा. सुमित भारंबे आणि प्रा. सचिन पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाला तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रमोद पांढरे तसेच वैद्यकीय अधिकारी डॉ. अजय पाल आणि डॉ. गौरव जाधव यांची उपस्थिती लाभली. याशिवाय आशा कार्यकर्त्यांचे मोलाचे सहकार्य मिळाले.

या जनजागृती रॅलीमुळे नागरिकांमध्ये मलेरियाबाबत जागरूकता निर्माण झाली असून, रोग प्रतिबंधासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची प्रेरणा मिळाली आहे. आरोग्य विभागाच्या या उपक्रमामुळे स्थानिक पातळीवर सार्वजनिक आरोग्याबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाल्याचे दिसून आले.

## डॉ. प्रमोद आमोदकर नशिराबाद सार्वजनिक वाचनालयाचे प्रभारी अध्यक्ष

### सर्वानुमते निवड; वाचनालयाच्या प्रगतीला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा

जन सम्राट टाईम्स



**नशिराबाद |** प्रतिनिधी | नशिराबाद येथील प्रतिष्ठित नशिराबाद सार्वजनिक वाचनालय च्या प्रभारी अध्यक्षपदी डॉ. प्रमोद पितांबर आमोदकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे वाचनालयाच्या कार्याला नवी दिशा मिळणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

नुकत्याच पार पडलेल्या वाचनालयाच्या बैठकीत ही निवड प्रक्रिया पार पडली. वाचनालयाचे कामकाज अधिक सक्षम, प्रगल्भ आणि सुव्यवस्थित करण्यासाठी अनुभवी नेतृत्वाची गरज असल्याचे सदस्यांनी नमूद केले. डॉ. आमोदकर यांच्या निवडीमुळे ही गरज पूर्ण झाली असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

डॉ. प्रमोद आमोदकर हे त्यांच्या कुशल नेतृत्वशैली आणि मनमिळावू स्वभावामुळे परिसरात परिचित आहेत. विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला असून, त्यांच्या अनुभवाचा लाभ वाचनालयाच्या विकासासाठी होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**वाचनसंस्कृतीला चालना देण्यावर भर**

वाचनालयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, विविध शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम राबवणे आणि अधिकाधिक वाचकांना आकर्षित करणे, यावर डॉ. आमोदकर भर देतील, अशी अपेक्षा सदस्यांनी व्यक्त केली.

**सर्व स्तरांतून अभिनंदन**

डॉ. आमोदकर यांच्या नियुक्तीचे गावातील मान्यवर, वाचकवर्ग आणि विविध क्षेत्रांतील व्यक्तींनी स्वागत केले आहे. त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देताना वाचनालयाच्या प्रगतीसाठी त्यांच्या नेतृत्वातून सकारात्मक बदल घडतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

एकूणच, या निवडीमुळे नशिराबाद सार्वजनिक वाचनालयाच्या कार्यात नवचैतन्य निर्माण होऊन वाचनसंस्कृतीला अधिक बळ मिळणार आहे.

## जळगाव मनपातील भूसंपादन प्रकरणांची SIT चौकशी करा

### आ. राजूमामा भोळेंची मुख्यमंत्र्यांकडे मागणी



जन सम्राट टाईम्स

**जळगाव |** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आज जळगाव विमानतळावर आगमन झाले असता, यावेळी आमदार राजुमामा भोळे यांनी जळगाव शहराच्या दोन अत्यंत महत्त्वाच्या विषयांवर मुख्यमंत्र्यांशी सविस्तर चर्चा करून त्यांना निवेदने सादर केली. यामध्ये जळगाव महानगरपालिकेतील संशयास्पद भूसंपादन प्रकरणांची 'विशेष तपास पथक' (SIT) मार्फत चौकशी करण्याची आणि शहरातील रस्ते विकासासाठी २०० कोटी रुपयांचा विशेष निधी देण्याची मागणी केली. या मागणीमुळे जळगावच्या राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

**निवेदनात काय म्हटलं आहे?**

आमदार भोळे यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात जळगाव महानगरपालिकेतील विविध भूसंपादन प्रकरणांमध्ये प्रशासकीय त्रुटी आणि चुकीच्या मूल्यांकनामुळे शासनावर मोठा आर्थिक भार पडत असल्याचे निदर्शनास आणून दिले. विशेषतः मौजे जळगाव आणि मेहरूणमधील काही विशिष्ट संशयास्पद प्रकरणांची उच्चस्तरीय समिती किंवा विशेष तपास पथकाद्वारे (SIT) सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे, जेणेकरून सार्वजनिक निधीचा अपव्यय थांबेल.

एकीकडे जमीनमालकांना त्यांच्या हक्काचा व योग्य मोबदला मिळणे आवश्यक असले तरी दुसरीकडे सार्वजनिक निधीचा अपव्यय होऊ नये, यासाठी मोबदल्यास वाजवी मर्यादा असणेही तितकेच आवश्यक आहे. तथा, चौकशीअंती संबंधित प्रकरणे पात्र व न्याय्य असल्यास जमीनमालकांना वाजवी मोबदला अदा करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात यावा, अशी विनंती केली.

**जळगाव पर्यटन मार्गदर्शक पुस्तिका**

या प्रकरणातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे १२ ते २३ वर्षांचा झालेला विलंब. या विलंबामुळे व्याजाचा बोजा वाढून मूळ मोबदल्यापेक्षा अनेक पटीने जास्त रक्कम देण्याची वेळ आली आहे. योग्य वेळी भूसंपादन न करणे, न्यायालयात पालिकेची बाजू कमकुवत मांडणे आणि वेळेत कागदपत्रे सादर न करणे, या सर्व बाबी संशयास्पद असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

## जळगावच्या चौकांमध्ये 'वॉटर शॉवर'; महापालिकेची थंडावा देण्याची विशेष मोहीम

### ४२°C पार तापमानाचा सामना; महापौर दीपमाला काळे यांच्या निर्देशानुसार मुख्य रस्त्यांवर पाण्याचे फवारे

जन सम्राट टाईम्स




**जळगाव :** जळगाव शहरात वाढत्या उष्णतेचा प्रचंड तडाखा जाणवत असून तापमानाचा पारा ४२ अंश सेल्सिअसच्या पुढे गेल्याने नागरिकांचे हाल होत आहेत. या पार्श्वभूमीवर उष्णतेपासून काहीसा दिलासा मिळावा आणि शहरात थंडावा निर्माण व्हावा, यासाठी जळगाव शहर महानगरपालिका तर्फे विशेष 'वॉटर शॉवर' मोहीम राबवण्यात आली. शनिवारी (२५ एप्रिल) दुपारी शहरातील प्रमुख चौकांमध्ये टँकरद्वारे पाण्याचे फवारे मारण्यात आले. ही मोहीम महापौर दीपमाला काळे यांच्या निर्देशानुसार आणि शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करत राबवण्यात आली. दुपारच्या कडक उन्हामुळे रस्ते तापल्याने परिसरातील तापमान अधिक वाढत असल्याने, त्या उष्णतेवर नियंत्रण मिळवण्यासाठी महापालिकेने तातडीने उपाययोजना केली.

**महत्त्वाच्या चौकांमध्ये फवारे**

महापालिकेने दोन टँकरच्या सहाय्याने शहरातील प्रमुख व वर्दळीच्या चौकांमध्ये पाणी मारण्याची कार्यवाही केली. यात चित्रा चौक, कोर्ट चौक, नवीन बस स्थानक परिसर, आकाशवाणी चौक, काव्यरत्नावली चौक, नेहरू चौक आणि टॉवर चौक यांचा समावेश होता. या ठिकाणी पाण्याचे फवारे मारल्यामुळे परिसरात काही प्रमाणात थंडावा निर्माण झाला.

**नागरिकांना तात्पुरता दिलासा**

दुपारच्या कडक उन्हात रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या वाहनधारकांना आणि पादचाऱ्यांना या उपक्रमामुळे मोठा दिलासा मिळाला. उष्णतेच्या लाटेमुळे होणाऱ्या त्रासात काही प्रमाणात घट झाल्याचे नागरिकांनी सांगितले. विशेषतः वाहतूक कोंडी असलेल्या ठिकाणी पाण्याचे फवारे मारल्याने उष्णतेची तीव्रता कमी झाल्याचे जाणवले.

**अधिकाऱ्यांची प्रत्यक्ष उपस्थिती**

ही मोहीम प्रभावीपणे राबवण्यासाठी शहर अभियंता योगेश बोरोले आणि पर्यावरण विभागाचे अधिकारी प्रकाश पाटील यांच्यासह महापालिकेचे कर्मचारी प्रत्यक्ष रस्त्यावर उपस्थित होते.

### पुढील उपाययोजनांचा विचार

उष्णतेची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असल्याने अशाच प्रकारच्या उपाययोजना पुढील काळातही राबवण्याचा विचार महापालिका प्रशासन करत आहे. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने आणि शहरात थंडावा राखण्यासाठी अशा उपाययोजना आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. एकूणच, जळगाव महानगरपालिकेच्या या उपक्रमामुळे वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना तात्पुरता का होईना, पण दिलासा मिळाला असून प्रशासनाच्या या तत्परतेचे नागरिकांकडून स्वागत केले जात आहे.